# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ३१.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ३०/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४१,१००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ३०/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ०९.३६ लिटर दारू असा एकुण ४,४००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल गुन्हेः—**

दि. ३०/१२/२०२२ रोजी पोस्टे बासंबा येथे कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील मयत हे त्याचे जवळील मो.सा.क्र. एम.एच.२० डि.डब्ल्यु ६१८१ वर बसुन सिरसम येथे जात असतांना मो.सा.क्र.एम.एच.३८ झेड ७९०५ च्या चालकाने त्याचे मो.सा.हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मयताचे मोटार सायकला जोराची धडक देवुन मयत हे गंभीर जख्मी होवुन मयत झाले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३०/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०१ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.